दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 13 फेब्रुवारी 2026 | | अंक क्र. 266 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

''आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल''
हॉटेल बालाजी
ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.


Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# बीडच्या ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी 11 वसतिगृहे; 159.36 कोटींच्या आराखड्याला मान्यता



मुंबई | वृत्तसंस्था

स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये आणि त्यांना सुरक्षित निवासासह दर्जेदार सुविधा मिळाव्यात, यासाठी बीड जिल्ह्यात 11 सरकारी वसतिगृहे उभारण्यास 159.36 कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

'संत भगवान बाबा सरकारी वसतिगृह योजना' अंतर्गत ही वसतिगृहे उभारली जाणार असून, शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे पवार यांनी सांगितले.



## राज्यभरात ८२ वसतिगृहांचा आराखडा

ऊसतोड कामगारांची संख्या जास्त असलेल्या राज्यातील ४१ तालुक्यांमध्ये मुलांसाठी व मुलींसाठी प्रत्येकी ४१ अशा एकूण ८२ वसतिगृहांना राज्य सरकारने मान्यता दिली आहे. पहिल्या टप्प्यात २० वसतिगृहे (१० मुलांसाठी व १० मुलींसाठी) मंजूर करण्यात आली होती. आता उर्वरित ६२ वसतिगृहांना सुरूवात करण्यास हिरवा कंदील देण्यात आला आहे. सामाजिक न्याय विभागाच्या सरकारी ठरावाद्वारे एकट्या बीड जिल्ह्यात २२ वसतिगृहे मंजूर करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## दिवंगत अजित पवार यांचे स्वप्न-

सुनेत्रा पवार म्हणाल्या, "ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे दिवंगत अजित पवार यांचे स्वप्न होते. पालकमंत्री म्हणून त्यांनी या प्रस्तावाचा सातत्याने पाठपुरावा केला. अनेक ठिकाणी जमिनी निश्चित करण्यात आल्या असून, दर्जेदार बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या." मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी सारथी संस्थेच्या धर्तीवर आधुनिक व दर्जेदार सुविधा या वसतिगृहांमध्ये उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे.

## बांधकामाची सद्यस्थिती-

सध्या तीन ठिकाणी सरकारी जमीन उपलब्ध असून तेथे काम सुरू आहे. उर्वरित १९ वसतिगृहांपैकी ११ वसतिगृहांसाठी जमीन उपलब्ध झाली असून त्यांच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शैक्षणिक भविष्याला भक्कम आधार देणारा हा निर्णय बीड जिल्ह्यासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## कोणत्या ठिकाणी वसतिगृहे?

मान्यताप्राप्त वसतिगृहांमध्ये पाटोदा, केज, परळी, गेवराई आणि माजलगाव येथे प्रत्येकी दोन वसतिगृहे (एक मुलांसाठी व एक मुलींसाठी) तर बीड येथे एक मुलींचे वसतिगृह उभारले जाणार आहे. प्रत्येक वसतिगृहाची क्षमता १०० विद्यार्थ्यांची असणार आहे.

# बीडच्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस ना. पंकजाताई मुंडेंची उपस्थिती

### राज्यस्तरीय आढावा बैठकीत जालन्याला वाढीव २४० कोटीच्या निधीची केली मागणी

**मुंबई** : राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे हया आज उप मुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासमवेत बीड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थित होत्या. दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या राज्यस्तरीय आढावा बैठकीत त्यांनी पालकमंत्री या नात्याने जालना जिल्ह्याला वाढीव २४० कोटीची मागणी केली.




मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सहयाद्री अतिथीगृहात जिल्हा नियोजन समितीची राज्यस्तरीय आढावा बैठक पार पडली. त्या अगोदर बीड जिल्ह्याची नियोजन समितीची बैठक पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या दोन्ही बैठकांना ना. पंकजाताई मुंडे उपस्थित होत्या. बीडच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी काही महत्वाच्या सूचना बैठकीत केल्या.

■ **जालन्याला वाढीव निधीची मागणी**

बैठकीत पालकमंत्री म्हणून पंकजाताई मुंडे यांनी जालना जिल्हा वार्षिक योजनेच्या (डीपीडीसी) खर्चात आघाडीवर असल्याचे नमूद करत, मुख्यमंत्री 150 दिवस सुधारणा कार्यक्रम आणि 100 दिवसांच्या मूल्यमापनातही जिल्ह्याने अव्वल कामगिरी केल्याचे सांगितले. जालना ड्रायपोर्ट लवकरात लवकर सुरु करण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचे ही त्या यावेळी म्हणाल्या. 2026-27साठी जालना जिल्ह्यास शासनाकडून 359.24 कोटी रुपयांची निधी मर्यादा कळविण्यात आली आहे. त्यानुसार सन 2026-27 यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या 359 कोटी 24 लाखांच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. मात्र, जिल्ह्यातील विविध कार्यान्वयीन यंत्रणांकडून प्राप्त झालेल्या मागणी नुसार रु 600.00 कोटी रुपयांचा प्रस्तावित आराखडा राज्यस्तरीय बैठकीत ठेवण्यात आला आहे.त्यामुळे सुमारे रु 240.76 कोटी रुपये अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. त्यासाठी हा वाढीव निधी मिळावा अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री महोदयांना केली.

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतील ऐतिहासिक महापशुधन एक्स्पोचा शेतकरी, पशुपालकांनी लाभ घ्यावा

### परळी पालिकेचे बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांचे आवाहन

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

पशुसंवर्धन व पर्यावरण, हवामान बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून परळी वैजनाथ येथे ऐतिहासिक महापशुधन एक्स्पो-2026 चे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये देशाच्या कानाकोपऱ्यातून पशुपालक सहभागी होणार असुन पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड यातून मिळणार आहे. परळीच्या इतिहासात प्रथमच होत असलेल्या या प्रदर्शनात शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभागी व्हावे असे आवाहन परळी वैजनाथ नगर पालिकेतील बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.



परळीच्या तहसिल कार्यालयासमोरील ओपळे मैदानावर दि.13 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रीय पशुप्रदर्शन संपन्न होत आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन उद्या शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते तर बक्षीस वितरण शनिवार दि. 14 फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. बेरोजगार व शेतकऱ्यांना शेतीशी निगडित विविध उत्पादनाची माहिती मिळावी आणि त्यातून त्यांच्या हाताला काम मिळून त्यांचा आर्थिक विकास ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासंदर्भात मार्गदर्शक ठरणार आहे.

महा पशुधन एक्स्पो
परळी वैजनाथ

ना. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली परळीच्या इतिहासात प्रथमच देश पातळीवरील पशुधन महा एक्सपो आयोजित करण्यात आला आहे. या प्रदर्शनाचा शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभाग घ्यावा असे आवाहन परळी वैजनाथ नगर पालिकेतील बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

# परळीतील कृषी व पशुवैद्यकीय महाविद्यालयांना स्व. अजितदादा पवार यांचे नाव द्यावे

## दीपक देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ येथे प्रस्तावित कृषी महाविद्यालय आणि पशुवैद्यकीय महाविद्यालयांना स्वर्गीय अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी ठाम मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार पक्ष) चे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

देशमुख यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, स्व. अजितदादा पवार यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात मोलाचा वाटा उचलला. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कार्य करताना त्यांनी जिल्ह्याच्या प्रगतीसाठी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती दिली. विशेषतः शेती, सिंचन, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांमध्ये त्यांनी दूरदृष्टी ठेवून घेतलेल्या निर्णयांमुळे बीड जिल्ह्यात विकासाची नवी दिशा निर्माण झाली.

परळी वैजनाथ येथे उभारण्यात येणारी कृषी व पशुवैद्यकीय महाविद्यालये ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी ठरणार आहेत. या संस्थांमुळे परिसरातील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली होतील तसेच कृषी व पशुसंवर्धन क्षेत्राला आधुनिक ज्ञानाची जोड मिळेल, असा विश्वास देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

"अशा महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांना स्वर्गीय अजितदादा पवार यांचे नाव देण्यात आल्यास त्यांच्या कार्याला योग्य सन्मान मिळेल आणि भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी वारसा निर्माण होईल," असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

मुख्यमंत्र्यांनी या मागणीचा सहानुभूतीपूर्वक आणि सकारात्मक विचार करून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा दीपक देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

# कै. डी एन कांदे सर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम






**श्री सोमेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री रत्नेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टोकवाडी येथे आज 12 फेब्रुवारी रोजी संस्थेचे संस्थापकीय सचिव कै.डी. एन. कांदे सर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला .या प्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री कराड सर यांनी कांदे सरांच्या शैक्षणिक, सामाजिक व संस्थात्मक कार्याचा अत्यंत सखोल व प्रेरणादायी आढावा घेतला. त्यांनी कांदे सरांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, शिक्षण क्षेत्रातील त्यांचे भरीव योगदान, विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ आणि संस्थेच्या उभारणीत केलेले अथक परिश्रम यांचा प्रभावी शब्दांत गौरव केला. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी आदर्श, शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि समाजाभिमुखता या मूल्यांचे पालन करावे, असा मौलिक संदेश त्यांनी दिला. कराड सरांचे विचार उपस्थितांना प्रेरणादायी व चिंतनशील ठरले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य किलचे एस. डी. सर यांनीही कांदे सरांना भावपूर्ण अभिवादन करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले. जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन**

# विवेकशील मानव निर्माणाचा पथदर्शी ग्रंथ : बा तथागता !

'बा, तथागता !' या मराठी भाषेतील विशालकाव्याचे मूळ कवी प्रा. डॉ.म.सु.पगारे हे भाषा आणि साहित्याचे चिकित्सक, मर्मग्राही अभ्यासक म्हणून ओळखले जातात. 'बा तथागता !' या विशालकाव्यातून त्यांनी तात्त्विक, वैचारिक आणि संशोधनात्मक दृष्टिकोनातून बौद्ध तत्त्वज्ञानातील विचारधन वाचकांसमोर ठेवले आहे. सहज आणि सोप्या पद्धतीने आकलन होईल अशी मांडणी त्यांनी केली आहे.

मानवतावादी विचार प्रेरणेचे विशालकाव्य खानदेशातील अहिराणी भाषकांसाठी अहिराणी बोली भाषेतून "बा, तथागता ! अहिरानीम्हातली लिखायी- वा.ना. आंधळे " या नावाने हे अनुवादित पुस्तक १२ मे २०२५ रोजी बुद्ध पौर्णिमेला प्रकाशित झाले. कवी प्रा.वा.ना. आंधळे यांच्या अस्सल अहिराणी बोलीची पकड या कवितेला लाभलेली आहे. ज्यावेळी कलाकृतीला खानदेशच्या मातीचा, मायबोलीचा, भावनांचा स्पर्श होतो तेव्हा ती नव्याने फुलून आलेली जाणवते. तीन दीर्घ आविष्करणातून प्रकट झालेल्या 'बा, तथागता!' या विशाल काव्याचा केंद्रबिंदू हा 'मानव आणि मानवतावाद' असा आहे. माणूस म्हटला की त्याच्यासोबत षड:रिपू आलेच. जिथे षड:रिपू आले तेथे विनाशाची वाटचाल सुरू होते. या विनाशावरचा उपाय शोधण्याचे, विनाशाचे मूळ शोधण्याचे काम संत परंपरेने केले. त्यापूर्वी ते बुद्धांनी केले. कवीने बुद्धाला 'तथागत' असे संबोधले आहे. 'तथागत' हा शब्द पाली आणि संस्कृत या दोन्ही भाषेत सारखाच आलेला आहे. सत्य शोधणारा, सत्य स्विकारणारा आणि सत्य दाखविणारा म्हणजे तथागत ! 'बा, तथागत' हा काव्यसंग्रह वाचताना मानवी वृत्तीच्या चांगल्या वाईट कृतीचा उलगडा होत जातो. बुद्धाच्या नैतिक आचरणाशी संबंधित ज्या बाबी आपल्याला लक्षात येतात त्याचा संबोध 'तथागत' या नावात लक्षात येतो आणि या शीर्षकाची यथार्थता पटू लागते.

माणूस हा पूर्वीपासून बुद्धीवादी आहे. तसाच तो धाडसी, पराक्रमी, शूर आहे मात्र तेवढाच भित्रा आहे. नैसर्गिक घटनांना चमत्कार मानून, त्यातून बचावासाठी कर्मकांडात गुरफटत गेला. या कर्मकांडाचा गैरफायदा घेत त्याला मानसिक दृष्ट्या गुलाम करण्यात, दैववादाकडे वळविण्यात काही धूर्त मंडळी यशस्वी झाली. या आशयाच्या ओळींसाठी प्रा. आंधळे यांनी बोलीभाषेतील उपयोजिलेले शब्द प्रयोग वाचकाच्या अंतर्मनाचा ठाव घेतात. "गोल गोल फिरतस/ कितलाक मान्शे/ अंधारना गुफामझार/शानावातना उजेड शे आसा भरम व्हयीशीनी/ भायेरबी हिंगता येत नही/ इतलं अवघड/ आन मंग आटकतस/ करमकुभांडना अंधार गुफामा/"

"सडत -हातंस मान्शेस्ना कितलाक टोय/ आखो कितल्याक पिढ्या/ पिचत पडतंस आदन्यानम्हा/ बिनकामना व्हयी जातंस ग्यान बिगर/ त्याना पाय-हे जलमत नही/ मानोस्कीनं नवं बीजवाड!"(पृष्ठ क्र.३४)

अलीकडच्या काळात भौतिकवादाला, जडवादाला आणि अनियंत्रित उच्छादवादाला मोठे महत्त्व प्राप्त होत आहे. मनुष्याच्या विकासासाठी त्याची भौतिक प्रगती होणे गरजेचे आहे. हे सगळेजण मान्य करतील. मात्र फक्त भौतिक दृष्ट्या प्रगत होणे म्हणजे माणूस पण असते का ? तर तो शीलवान असणे, त्याचा मानसिक विकास होणेही नितांत गरजेचे आहे. दुर्दैवाने आज या वैचारिक विकासासाठी प्रयत्न होताना दिसत नाही. माणसाला विवेकी, बुद्धीवादी, सुसंस्कारी, मानवतावादी होण्यासाठीचे सामर्थ्य बुद्धाच्या तत्त्वज्ञानात आहे. सम्यक संबोधी, सम्यक दृष्टीने बुद्धाने सांगितलेली चार आर्यसत्ये, दुःख, दुःखाचे कारण, दुःख निरोधाचा मार्ग, आर्य अष्टांगिक मार्ग या सगळ्यातून माणूस आपल्या मनावर विवेकी विजय मिळवू शकतो असा




विश्वास कवीला आहे.

दुस-या दीर्घ आविष्करणात नमूद केलेल्या आर्य अष्टांगिक योगातील आठ मार्गासाठी अनुवादकाने अहिराणी बोलीतील पुढील शब्द प्रयोग केलेले आहेत. मननी नजर(सम्यक दृष्टी), इरादा सदाचरनना (सम्यक संकल्प), नेम्बन वाचा (सम्यक वाचा) चांगली वागनूक (सम्यक कर्मान्त), रोजना जगासाठे करानी खटपट (सम्यक अजिविका), चांगली कसरत, कष्ट (सम्यक व्यायाम), नेम्बन आठवन (सम्यक स्मृती), एकचित समाधी (सम्यक समाधी) वरील सर्व शब्द पाहता 'सम्यक' या शब्दासाठी अहिराणीतून कितीतरी वेगळे शब्द अनुवादकाने उपयोजिले आहेत. या भागातील लेखनात प्रा.आंधळे यांनी अहिराणी बोलीतील बाजूला पडत चाललेल्या कितीतरी शब्दांना उजेडात आणल्याचे दिसून येते. बौद्ध तत्त्वज्ञानातील वेगवेगळ्या कृती, उपक्रमांना वैशिष्ट्यपूर्ण व चपखल अहिराणी शब्दात पेरण्याचे अवघड काम अनुवादातून झालेले आहे. १४८ पानांच्या या दीर्घ अविष्करणाला प्रा. वा.ना.आंधळे यांनी अहिराणी बोलीतून पुरेपूर न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

तिसऱ्या आविष्कारणात कवी माणसाच्या आत्मनिर्भरतेविषयी आपली मते मांडताना दिसतो. कोणत्याच माणसाने कोणाचे गुलाम होऊ नये व ज्याच्याजवळ सामर्थ्य आहे त्या व्यक्तीनेही कोणाला गुलाम करू नये. ही मानवतावादी अपेक्षा कवी येथे व्यक्त करताना दिसतो. माणसाने आपल्या अंगी असलेल्या सामर्थ्याला, कर्तृत्वाला न्याय दिला पाहिजे. आपल्यावरील जबाबदारीचे भान जपले पाहिजे. हे अविष्करणही तितक्याच ताकदीने प्रा. आंधळे यांनी अनुवादित केले आहे.

काव्यसंग्रहाच्या शेवटी शब्दसूची मधून ३७० अहिराणी शब्दांचा मराठी अर्थ दिला आहे. जो जुन्या अहिराणी शब्दांच्या अर्थबोधासाठी महत्त्वाचा आहे. मुखपृष्ठ व मलपृष्ठावरील तथागत गौतम बुद्धांचे ध्यानमग्न अवस्थेतील चित्र वाचकाला पुस्तक हातात घेण्याची इच्छा निर्माण करणारे आहे. 'अत्त दीप भव! सवता परकास व्हा! दुखपाशीन दूर व्हा!' कवितेचा शेवट असलेल्या व बुद्ध तत्त्वज्ञानाचे सार सांगणा-या मलपृष्ठावरील या ओळी पुस्तकाची विचारधारा अधोरेखित करणा-या आहेत. हार्डबाऊंड बांधणी असलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन प्रशांत पब्लिकेशन, जळगाव यांनी केले आहे. प्रा.वा.ना. आंधळे यांनी अहिराणी अनुवादातून अहिराणी साहित्य विश्वात एका चांगल्या ग्रंथाची भर टाकली आहे. हे कोणीही मान्य करेल. त्यांच्या या प्रयत्नांबद्दल अभिनंदन ! त्यांच्या यापुढील लेखनासाठी शुभेच्छा !

**– डॉ नरेंद्र बापूजी खैरनार, साक्री**
**– भ्र.९४२१८८४०२४**

## लोकरंजन

# सिनेरंग : तू या मैं 'चा म्युझिक लॉन्च सोहळा ठरला शानदार




रोमँटिक 'जी लिया'पासून 'फेम अस'*च्या जोरदार एनर्जीपर्यंत आणि 'नाम करू बडा'*च्या रॉ बीट्सपर्यंत, 'तू या मैं'चा अल्बम प्रेमाला रॅप आणि हिप-हॉपसोबत प्रभावीपणे जोडतो. हा अल्बम बोल्ड, फ्रेश आणि प्रेक्षकांना सहज जोडणारा साउंडस्केप तयार करतो. चित्रपटाच्या रिलीजच्या काही दिवस आधीच मेकर्सनी नॉस्टॅल्जिक पण कंटेम्पररी 'आंखें चार' हे गाणं रिलीज केलं, ज्याने क्षणातच तरुणाईच्या मनाला स्पर्श केला आणि संपूर्ण वातावरण व्हाइबमध्ये बदलून टाकलं.

तू या मैं'च्या संगीताचं भव्य आणि पॉवर-पॅक्ड लॉन्च करण्यात आलं, जे एक अविस्मरणीय ठरल. या कार्यक्रमाला शनाया कपूर, आदर्श गौरव, दिग्दर्शक बेजॉय नांबियार, निर्माते आनंद एल राय आणि हिमांशु शर्मा यांच्यासह 7 बंटाइझ आणि संपूर्ण टीम उपस्थित होती. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह आणि जबरदस्त एनर्जी पाहायला मिळाली. आदर्श गौरवने 'नाम करू बडा'*वर दमदार परफॉर्मन्स देत स्टेज गाजवला, तर 'जी लिया'*ने प्रेक्षकांच्या मनाला भिडलं. शनाया कपूर, आदर्श गौरव, परुल गुलाटी आणि अंशसह संपूर्ण स्टारकास्टने 7 बंटाइझसोबत *'फेम अस'*वर भन्नाट परफॉर्मन्स सादर केला, ज्यामुळे संपूर्ण हॉल थिरकायला लागला.

बेजॉय नांबियार दिग्दर्शित 'तू या मैं' या चित्रपटाची निर्मिती कलर यलो बॅनरखाली आनंद एल राय आणि हिमांशु शर्मा यांनी केली आहे. हा चित्रपट 'तू या मैं' 13 फेब्रुवारी 2026 रोजी प्रदर्शित होणार आहे.

# व्हर्च्युअल स्टुडिओमध्ये चित्रित केलेला भारतातील पहिला म्युझिक व्हिडिओ 'शरमणा'

गायक, संगीतकार आणि दिग्दर्शक रामजी गुलाटी यांनी त्यांचा नवीनतम एकल "शरमणा" रिलीज केला आहे, जो आता सर्व प्रमुख डिजिटल प्लॅटफॉर्मवर स्ट्रीमिंग होत आहे. के सेरा सेरा सादर करत असलेले हे गाणे भारतीय संगीत निर्मितीतील एक महत्त्वाचा क्षण आहे कारण एआय इंटिग्रेशनसह पूर्णपणे व्हर्च्युअल स्टुडिओ वातावरणात तयार केलेला हा पहिला म्युझिक व्हिडिओ आहे, जो व्हिज्युअल स्टोरीटेलिंगसाठी एक नवीन बेंचमार्क स्थापित करतो.

शरमणा पारंपारिक संगीत व्हिडिओंच्या सीमा ओलांडून दृश्यात्मकदृष्ट्या तल्लीन करणारा अनुभव देण्यासाठी समकालीन भारतीय पॉपला व्हर्च्युअल प्रोडक्शन तंत्रज्ञानाशी जोडते. डिजिटली तयार केलेल्या वातावरणाचा आणि नियंत्रित व्हर्च्युअल सेट्सचा वापर करून, हा प्रकल्प मुख्य प्रवाहातील मनोरंजनात तंत्रज्ञानावर आधारित सर्जनशीलतेकडे वाढत असलेल्या बदलाचे प्रतिबिंबित करतो.




या म्युझिक व्हिडिओमध्ये अभिनेता रोहन मेहरासोबत नवोदित अभिनेत्री हिया आहे, ज्यामध्ये बिग लव्हचे रॅप व्होकल्स आणि कुंवर जुनेजा यांनी लिहिलेले गीत आहे. एकत्रितपणे, सहयोगी कामगिरी, फॅशन आणि शैलीबद्ध व्हर्च्युअल व्हिज्युअल्स एकत्र आणून एक आकर्षक ऑन-स्क्रीन कथा तयार करतात.

# झी स्टुडिओजच्या ' सुपर डुपर 'चा टीझर प्रदर्शित !




आपल्याकडे कौटुंबिक गोष्टी आवडीने बघणारा एक मोठा प्रेक्षकवर्ग आहे. कुटुंबातील सुख दुःखाच्या गोष्टीत रमणारा, कथेतील पात्रांसोबत हसणारा-रडणारा.. त्या पात्रांमध्ये स्वतःचा शोध घेणारा हा प्रेक्षकवर्ग नेहमीच कौटुंबिक विषयांना भरभरून दाद देतो. अशा सर्वच स्तरांतील, वयोगटातील आणि विविध भागांतील प्रेक्षकांना आवडेल, रुचेल आणि मनापासून भावेल अशीच गोष्ट असणारा ' सुपर डुपर ' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

झी स्टुडिओजची प्रस्तुती, नाईंटी नाईन प्रॉडक्शन्स तथा सिद्धिविनायक प्रॉडक्शन्सची निर्मिती आणि समीर आशा पाटील यांचे दिग्दर्शन असलेल्या 'सुपर डुपर' या चित्रपटाचा धमाकेदार टीझर नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित झाला आहे.

या टिझरमधून चित्रपटातील एकाहून एक सरस कलाकारांची झलक बघायला मिळाली आहे. निर्मिती सावंत, शशांक शेंडे, हृषिकेश जोशी, नम्रता संभेराव, कुशल बद्रिके, प्रतीक्षा कोते आणि मुख्य नायक नायिकेच्या भूमिकेत असलेले ललित प्रभाकर आणि विदुला चौगुले अशी भलीमोठी स्टारकास्ट यामध्ये झळकणार आहे. कौटुंबिक महासोहळा अशी टॅगलाईन असलेला हा चित्रपट येत्या ३ एप्रिलला प्रदर्शित होणार असून टीझरमुळे प्रेक्षकांची उत्सकुता वाढली आहे. या चित्रपटाचे विजय शिंदे आणि नरेश बोर्डे निर्माते आहेत. तर उमेश कुमार बन्सल, बवेश जानवलेकर प्रस्तुतकर्ता आहेत.

**संकलन –संयोजन**
**सुबोध रणशेवरे**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

### महापशूधन एक्स्पो म्हणजे ना . पंकजाताई मुंडे यांच्या कडून महाशिवरात्री निमित्ताने महाभेट

# पशुपालक, पशुप्रेमी व परळीकरांनी या ऐतिहासिक प्रदर्शनाचा लाभ घ्यावा - अश्विन मोगरकर

**परळी वैजनाथ|** परळी वैजनाथ शहरात होत असलेल्या देशपातळीवरील महापशूधन एक्स्पोमुळे परळीकरांना राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजताई मुंडे यांच्या कडून महाशिवरात्री निमित्ताने महाभेट मिळाली असून या तीन दिवसीय प्रदर्शनाचा परळीकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केले आहे.

दि. १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान ना. पंकजताई मुंडे मंत्री असलेल्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने 'अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे' भव्य आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातींचे जातिवंत गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या, कुत्रे पशुपालक, पक्षीप्रेमी व सर्वसामान्य नागरिकांना जवळून पाहायला मिळणार आहेत. देशपातळीवर होत असलेल्या या प्रदर्शन परळी साठी ऐतिहासिक आहे. संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे. नवीन तंत्रज्ञान व दर्जेदार पशुधनाची माहिती घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील ओपळे मैदानात या कार्यक्रमाचे उदघाटन आज शुक्रवार दि 13 फेब्रुवारी रोजी राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजताई मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनास परळीकरांनी भेट द्यावी असे आवाहन भाजपा सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केले आहे.



# ना. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतील महापशुधन एक्स्पोत पशुपालकांनी सहभागी व्हावे- निळकंठ चाटे

**परळी वैजनाथ |** पशुसंवर्धन व पर्यावरण, हवामान बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून परळी वैजनाथ येथे होत असलेल्या देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-2026 या प्रदर्शनाच्या माध्यमातून राज्यातील आणि देशातील पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी म्हणून आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनात शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभागी व्हावे असे आवाहन भाजपचे युवक नेते निळकंठ चाटे यांनी केले आहे.

तहसिल समोरील ओपळे मैदानावर दि.13 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रीय पशुप्रदर्शन संपन्न होत आहे. बेरोजगार व शेतकऱ्यांना दूध, मांस, अंडी उत्पादनाची माहिती मिळावी आणि त्यातून त्यांच्या हाताला काम मिळून त्यांचा आर्थिक विकास ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासंदर्भात मार्गदर्शक ठरणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन उद्या शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते तर बक्षीस वितरण शनिवार दि. 14 फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. परळीच्या इतिहासात प्रथमच देश पातळीवरील पशुधन महा एक्सपो आयोजित करण्यात आला आहे.या भव्य प्रदर्शनाचा शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभाग घ्यावा असे आवाहन भाजपचे युवक नेते निळकंठ चाटे यांनी केले आहे.



# महापशुधन एक्स्पो–2026 व महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर परळीत मांस व दारू विक्रीवर कडक बंदीची मागणी

### जिल्हाधिकारी, पालकमंत्री, मंत्री व उत्पादन शुल्क विभागाकडे शिवकुमार केदारी यांचे ईमेलद्वारे निवेदन

**परळी वैजनाथ (वार्ताहर)**

परळी वैजनाथ हे भारताच्या 12 ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र ज्योतिर्लिंग असून, येथे दरवर्षी महाशिवरात्रीच्या पावन पर्वणीच्या निमित्ताने लाखो भाविक प्रभू श्री वैद्यनाथ भगवान यांच्या दर्शनासाठी येतात. संपूर्ण देशभरातील शिवभक्तांसाठी परळी वैजनाथ हे श्रद्धेचे केंद्र मानले जाते.

याच पवित्र भूमीत दिनांक 13 ते 15 फेब्रुवारी 2026 दरम्यान "महापशुधन एक्स्पो-2026" (अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शन) या भव्य राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे हे आयोजन मा. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या आदरणीय ना. पंकजाताई मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून साकारत असून, राज्यासाठी व देशासाठी हे एक ऐतिहासिक, अभिमानास्पद व महत्त्वपूर्ण आयोजन ठरणार आहे. या प्रदर्शनामुळे परळी वैजनाथची ओळख देशपातळीवर अधिक ठळक होणार आहे.

दरम्यान, दिनांक 15 फेब्रुवारी 2026 रोजी महाशिवरात्रीचा पवित्र दिवस असून, दिनांक 16 फेब्रुवारी 2026 सोमवार रोजी देखील परळी शहरात दर्शन, अभिषेक, पूजन व धार्मिक कार्यक्रमांसाठी भाविकांची मोठी गर्दी होणार आहे. तसेच परळी शहरापासून अवघ्या 5 कि.मी. अंतरावर असलेले श्री सोमेश्वर महाराज जागृत देवस्थान हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, अनेक वर्षांपासून श्री सोमेश्वर महाराजांची पालखी परळी शहरात येत असते. त्यामुळे या काळात संपूर्ण परिसर भक्तिमय व धार्मिक वातावरणाने भारावून जातो.



या पार्श्वभूमीवर परळी शहराची धार्मिक पवित्रता, भाविकांची श्रद्धा तसेच सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दिनांक 13 फेब्रुवारी ते 16 फेब्रुवारी 2026 या कालावधीत परळी शहर व परिसरात मांस विक्री, कत्तलखाने, मांस वाहतूक तसेच दारू विक्री व मद्यसेवनावर पूर्णतः कडक बंदी लागू करावी, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते श्री. शिवकुमार केदारी (हिंद नगर, परळी वैजनाथ) यांनी केली आहे.

यासंदर्भात श्री. शिवकुमार केदारी यांनी ईमेलद्वारे निवेदन सादर करून मा. जिल्हाधिकारी साहेब बीड, मा. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदरणीय श्रीमती सुनेत्राताई अजित पवार, मा. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे साहेब, मा. आमदार धनंजय मुंडे साहेब, मा. पोलीस अधीक्षक साहेब बीड तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक यांच्याकडे तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या कालावधीत देशभरातून पशुपालन क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी, पशुपालक, शेतकरी, नागरिक तसेच लाखो शिवभक्त परळी वैजनाथ येथे दाखल होणार आहेत. अशा वेळी शहरात मांस विक्री व मद्यविक्री सुरू राहिल्यास भाविकांच्या धार्मिक भावना दुखावण्याची शक्यता असून, सामाजिक शांतता भंग पावण्याचा तसेच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने वेळेत निर्णय घेऊन परळी शहरात धार्मिक परंपरेचा सन्मान राखावा, अशी भूमिका श्री. शिवकुमार केदारी यांनी मांडली आहे.

तसेच निवेदनात परळी शहरातील हॉटेल, ढाबे, हातगाडी, दुकाने, बार व परवाना धारक यांच्यावर प्रशासनाने विशेष पथकाद्वारे कडक नियंत्रण ठेवावे, तसेच महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, स्वच्छता, वाहतूक नियंत्रण व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष आदेश निर्गमित करावेत, अशीही स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

■ **परळीच्या पवित्रतेसाठी निर्णय अपेक्षित**

महाशिवरात्रीच्या पर्वणीला तसेच महापशुधन एक्स्पो-2026 सारख्या राष्ट्रीय कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर परळी शहराची प्रतिमा उजळण्यासाठी प्रशासनाने मांस व मद्यविक्रीवर बंदीचे आदेश तातडीने लागू करावेत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

**श्री. शिवकुमार केदारी, हिंद नगर, परळी वैजनाथ**

# बीड कृषी विभागाच्या ई–निविदा प्रक्रियेत शासनाच्या नियमांना 'तिलांजली'

**आष्टी | प्रतिनिधी**

उपविभागीय कृषी कार्यालय, बीड यांच्यामार्फत नुकत्याच काढण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेत शासन निर्णयाचे (GR) सरळ-सरळ उल्लंघन झाल्याचा खळबळजनक आरोप महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी ते जिल्हाधिकाऱ्यांकडे करणार आहेत.

उपविभागीय कृषी कार्यालयाने ९ जानेवारी २०२६ रोजी खोल समतल चर आणि कंपार्टमेंट बंडिंगच्या कामांसाठी ई-निविदा प्रसिद्ध केल्या होत्या. यामध्ये आष्टी तालुक्यातील कासेवाडी, बुरुडवाडी, वनवेवाडी आणि शिरूर तालुक्यातील खरगवाडी, नागरेवाडी या गावांचा समावेश होता. या निविदा भरण्यासाठी २६ जानेवारी २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली होती. शासनाच्या २८ फेब्रुवारी २०२४ च्या निर्णयानुसार (GR), कोणत्याही निविदा प्रक्रियेत कामांची विभागणी करण्याचे स्पष्ट सांगण्यात आलेले आहे. असे असताना उपविभागीय कृषी अधिकारी यांनी मात्र या जीआर ला केराची टोपली दाखवल्याचे दिसून येत आहेत. शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्था: ३३%, सुशिक्षित बेरोजगार अभियंता: ३३%, खुला प्रवर्ग: ३४% अशाप्रकारे कामाचे वाटप होणे आवश्यक होते. परंतु, आष्टी विधानसभा मतदारसंघातील कामांचे वाटप करताना या टक्केवारीचे पालन करण्यात आलेले नाही. उपलब्ध माहितीनुसार, या ठिकाणी मजूर सहकारी संस्थांसाठी ५ कामे, बेरोजगार अभियंत्यांसाठी २ कामे आणि खुल्या वर्गासाठी १ काम दर्शविण्यात आले आहे. ही विभागणी शासन निर्णयाच्या निकषात बसत नसल्याचे दरेकर यांनी निदर्शनास आणून दिले आहे. मजूर सहकारी संस्था आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना कामाच्या सवलती मिळाव्यात यासाठी शासनाने स्पष्ट नियम केले असतानाही, कृषी विभागाने त्याकडे दुर्लक्ष केल्याने संताप व्यक्त होत आहे.


> **"कृषी विभागाने निविदा प्रक्रिया राबवताना मजूर संस्था आणि सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या हक्कावर गदा आणली आहे. शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता मनमानी पद्धतीने ही प्रक्रिया राबवली जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन करण्यात येईल."**
>
> **— कैलास दरेकर, जिल्हाध्यक्ष, मनसे शेतकरी सेना**

# ह.भ.प.न्यायाचार्य महंत सद्गुरू डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांचे आनंदाचे सिद्धांत ज्ञान अमृताची खाण

ज्ञान हे सृष्टी वरील सर्व दुःखाचं वेदनाशामक औषधं आहे ज्ञानाने सृष्टी वरील सगळ दुःख संपुष्टात येत नष्ट होत.अर्जुनाला विवंचनेतून दुःखातून बाहेर काढण्यासाठी भगवान श्रीकृष्ण यांनी गीता निर्माण केली कलियुगात ज्ञानेश्वर माऊली यांनी गीतेची ज्ञानेश्वरी करत सर्व सामान्य माणसाला ज्ञान अमृत दिलं आणि आता या तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानेश्वरी मधील प्रत्येक ओवी सर्व सामान्य माणसाला समजण्यासाठी देशातील एकमेव न्यायाचार्य भागवत धर्माचे प्रचारक प्रसारक ज्ञानाचे महासागर गुरू श्रीगुरू सद्गुरू श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांनी आध्यत्मिक क्षेत्रात क्रांती घडवत आनंदाचे सिद्धांत हि संकल्पना आणली आणि संबंध युटुब वर जगभरातील लाखो लोक या आनंदाच्या सिद्धांताचा लाभ घेत आहेत हि तंत्रज्ञान युगातील ज्ञानाची क्रांतीच आहे.डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांचे ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवीवरील भाष्य हे तन मन बुद्धी तृप्त करणार विवेचन असून विश्व कल्याणासाठी ऐतिहासिक पाऊल आहे. आनंदाचे सिद्धांत ज्ञान अमृताची खाण आहे कितीही दुःखी व्यक्तिने हे सिद्धांत ऐकले तर त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे भरते येणारच म्हणून हे आनंदाचे सिद्धांत आहेत डिजिटल साधानाचा वापर प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढला आहे त्यामुळे ज्ञानेश्वरी देखील डिजिटल करण्याचा जगातील पहिला प्रयोग भागवत धर्माचं ज्ञान पीठ श्री क्षेत्र भगवानगडाच अभूतपूर्व अस योगदान आहे आणि तंत्रज्ञान युगात जागतिक पातळीवर ज्ञानेश्वरी पोहचवून वैश्विक पातळीवर ज्ञानाचा वर्षाव करत श्री क्षेत्र भगवानगड ज्ञान पीठ हि ओळख सार्थ ठरवली आहे.अर्जुनाला जेव्हा रणभूमीवर जीवनाविषयी आणि संसारातील सृष्टी वरील वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने प्रश्न निर्माण झाले आणि त्याने दुःखी होऊन युद्ध न करण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्याच्या प्रत्येक प्रश्नच सटिक उत्तर भगवान श्रीकृष्ण यांनी दिले आणि अर्जुनाच्या शंका निरासन करून त्यांचं अंतःकरण तृप्त केले आणि त्याच्यावर ज्ञान वर्षाव केला ते सर्व क्षेत्राशी निगडित ज्ञान म्हणजे गीता होती ज्या मध्ये जन्म ते मृत्यू जीव सृष्टीचा आरंभ ते अंत यांसह प्रत्येक बाबीचा समावेश होता.आजच्या काळात सर्व सामान्य माणसाला अनेक प्रश्न आहेत समस्या अडचणी आहेत दुःख आहेत वेदना आहेत शंका आहेत या शंकांचं समाधान व्हावं आणि त्या माध्यमातून गीता ज्ञान अर्क देखील वैश्विक पातळीवर विश्वाच्या कल्याणासाठी सर्वदूर पोहोचला पाहिजे म्हणून आनंदाचे सिद्धांत या माध्यमातून युटुब चॅनल वर ज्ञानेश्वरीच चिंतन अगदी सहज सुलभ करत ज्ञान वर्षाव करण्याचं महान कार्य या देशातील एकमेव न्याचार्या गुरू श्रीगुरू सद्गुरू ज्ञानाचे महासागर भागवत धर्माचे ज्ञान पीठ श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ नामदेवशास्त्रीजी यांनी सहजपणे केले आहे त्याचा लाभ लहान थोरा पासून थोर मोठ्या पर्यंत सगळ्यांना होत आहे.सध्या तंत्रज्ञानाचा लाभ कमी आणि तोटाच जास्त होतं आहे तरी देखील तंत्रज्ञानाचा योग्य विनियोग व्हावा यासाठी आध्यत्मिक



क्षेत्रात नव क्रांती घडवली आहे.तंत्रज्ञान युगात वाचन संस्कृती जवळपास संपुष्टात आली आहे लोकांना काम काहिच नाही मात्र वेळ कोणाकडे देखील उपलब्ध नाही आणि लोक आधिक गतीमान व चंचल झाले आहेत या विचित्र काळात देखील सर्व सामान्य लोक ज्ञाना पासून वंचित राहू नयेत म्हणून ज्ञानाचे महासागर गुरू श्रीगुरू सद्गुरू देशातील एकमेव न्यायाचार्य डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांनी आनंदाचे सिद्धांत स्वरूपात ज्ञानेश्वरी वैश्विक पातळीवर अगदी सुलभ आणि सोपी करत पोहोचवली आहे ज्यांचं लाभ वैश्विक पातळीवर सगळ्यांना होत आहे.ज्ञानेश्वरी हे भगवद्गीतेवरील अमर भाष्य आहे जे आनंदाचे गहन सिद्धांत शिकवते. तंत्रज्ञानाच्या या वेगवान युगातही ती ज्ञानाची अमृतखाण ठरली आहे जी वैश्विक पातळीवर मानवी मनाला शांती आणि आनंदाची अनुभूती प्राप्त करून देते दारिद्रय अथवा गरिबी हि फक्त अर्थिक नसते तर वैचारिक मानसिक आणि सामाजिक देखील असते या तिन्ही स्तरांवर असणारी गरिबी अथवा दारिद्र्य संपुष्टात येण्यासाठी आनंदाचे सिद्धांत हे संजीवनी बुटी ठरले आहेत म्हणून ज्ञान अमृत सिंचन हाच संतांचा जीवन उदेश असतो आणि तो श्री क्षेत्र भगवानगड येथून अविरत चालू आहे हे महाराष्ट्र राज्यांच भूषण आहे.ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जगद पालक भगवान श्रीकृष्ण यांनी सृष्टीच्या कल्याणासाठी प्रकट केलेल ज्ञान संतश्रेष्ठ जगद्गुरु ज्ञानेश्वर माऊली यांनी अगदी सहज सूलभ केल आणि हेच ज्ञान अमृत डॉ नामदेवशास्त्रीजी




महाराज यांनी आनंदाचे सिद्धांत या संकल्पनेचा विस्तार करत ज्ञानेश्वरीतील आनंद सर्वदूर वैश्विक पातळीवर पोहचवला ज्ञानेश्वरी हे केवळ क्षणिक सुख नसून तो शाश्वत आनंद तर आहेच त्या पुढे जाऊन तो आत्मसाक्षात्कारातून मिळणारा परमानंद देखील आहे याची प्रचिती आणि अनुभूती आनंदाचे सिद्धांतातून प्रकट होत आहे.भक्ती हा मायारूपी नदी पार करणारा एकमेव मार्ग असून त्यातून दुःखाची निवृत्ती होऊन आनंदाची प्राप्ती होते अष्ट सात्त्विक भावांद्वारे ते आनंदाच्या मनोज्ञ अवस्था चित्रित करतात ज्यात शांती आणि आनंद एकत्व पावतात प्रत्येक ओवीच सप्रमाण विवेचन यथार्थ वर्णन आणि वास्तव चित्रण प्रभावी मांडणी ज्यामुळे सर्व सामान्य माणसाला ज्ञान बोध होऊन अंतःकरण शुद्ध करून दुःख मुक्तीचं दर्शन घडते आहे. या सिद्धांतांचा आधार समत्वयोग आहे ज्यात सुख-दुःख समान पाहावे हा मुलभूत उपदेश आहे.निःस्वार्थ कर्म भक्ती आणि ज्ञान हे त्रिकोण आनंदाकडे घेऊन जाणारा पथ मार्ग आहे.ज्ञानेश्वर माऊली यांचे अद्वैत हे जगाला मिथ्या न मानता सद्वस्तूची प्रभा म्हणून पाहते ज्यामुळे जीवन आनंदमय होतं. ज्ञानेश्वरीचे मर्म हेच आहे की ज्ञानेश्वरी ही ज्ञानाची अमृतखाण आहे मात्र सर्व सामान्य माणसाला हे वास्तव समजविण्यासाठी आनंदाचे सिद्धांत एक प्रभावी माध्यम म्हणून सिद्ध झालं आहे.कर्मयोग ज्ञानयोग भक्तियोग आणि संन्यासयोग यांचे दर्शन ज्ञानेश्वरी मध्ये घडते ज्ञानेश्वर माऊली यांनी तर्काच्या फोलपणावर भक्ती आणि आत्मानुभवाला प्राधान्य दिले आहे हे वास्तव सत्य डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांनी अगदी सहजपणे श्रोत्यांना समजावले आहे म्हणून सावध अवस्थेत ध्यानस्थ होयच असेल तर आनंदाचे सिद्धांत ऐकून आत्म्याचे अमृत अर्जित केलेच पाहिजे. ईश्वर हे विश्वाचे आदिकारण असून त्याची साक्ष आत्म्यात मिळते. हे ज्ञान अमृतासारखे अमर असते सद्गुरू च्या कृपेने ते प्रवाहित होते तोच ज्ञान प्रवाह जो कुरू क्षेत्रात प्रकट झाला तो अलंकापुरी मार्गे व्हाया श्री क्षेत्र भगवानगडावर पोहचला आणि तंत्रज्ञान युगात माहितीचा अतिरेक असूनही मानसिक तणाव एकटेपणा वाढला आहे हे वास्तव आहे या सर्व समस्यांवर एकमेव पर्याय ज्ञानेश्वरीचे आनंद सिद्धांत हे डिजिटल क्षेत्रात प्रगती आणि मनाला आनंदी करून दुःख मुक्ती देणारे औषध आहे. समत्वयोगाने सोशल मीडियाच्या सुख-दुःखाच्या लाटांवर नियंत्रण मिळते तर निःस्वार्थ सेवेमुळे व्हर्च्युअल जगातही खरा आनंद शोधता येतो ज्ञानेश्वर माऊली यांच जग ही चैतन्याचा विलास हे तत्त्व क्रांतिकारी आहे.तंत्रज्ञान हे साधन असू नये तर आत्मानंदाकडे घेऊन जाणारा मार्ग असावा भक्तीचा मार्ग मायेच्या नदीत पाणीच उरायला सोडत नाही. वैश्विक पातळीवर ज्ञानेश्वरी आणि ज्ञानेश्वरीचा प्रभाव आता जागतिक पातळीवर निर्माण झाला आहे.डॉ नामदेवशास्त्रीजी महाराज यांनी प्रत्येक ओवी व्यवस्थित रित्या यूट्यूब सोशल मीडियावर प्रवचनांद्वारे आनंदाचे सिद्धांत या माध्यमातून लाखो लोकांपर्यंत पोहोचवली आहे. पाश्चात्य विचारवंतांसाठी तिचे अद्वैत आणि माइंडफुलनेसशी साम्य आहे. युरोप-अमेरिकेत वारकरी संप्रदायाचे अध्ययन होत असून, ज्ञानेश्वरीचे तत्त्वज्ञान योग, मेडिटेशनशी जोडले जाऊ लागले आहे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ती 'ग्लोबल गीता कमेंटरी' म्हणून उदयास आली आहे. आनंदाचे सिद्धांत हे युनिवर्सल सर्व धर्मांपलीकडे जाऊन विश्वात्म्याला जोडतात.आनंद सिद्धांतांची आधुनिक अंमलबजावणी ज्ञानेश्वरीला कालातीत बनवते.तंत्रज्ञान युगात आव्हान म्हणजे सततची विचलितता परंतु ज्ञानेश्वरीची संधी म्हणजे तीच तंत्रे वापरून म्हणजे युटुब शोशल मिडिया द्वारे आनंदाचा प्रचार आणि प्रसार.तरुण युवा वर्गाला 'आनंदाचे सिद्धांत सारख्या प्रवचनांमुळे सुलभ रित्या ज्ञान सागर उपलब्ध झाला आहे वैश्विक महामारीनंतर मानसिक आरोग्यासाठी आनंदाचे सिद्धांत हि काळाची गरज होती हिच गरज ओळखून श्री क्षेत्र भगवानगड येथून विश्वाच्या दिशेने ज्ञानाचा प्रकाश गतीमान झाला.ज्ञानेश्वरीचा शाश्वत वारसा म्हणजे ज्ञानेश्वरी हा केवळ ग्रंथ नसून आनंदाची जीवनपद्धती आहे याचा प्रत्यय आनंदाचे सिद्धांत देतात आणि तंत्रज्ञानाच्या वेगाला मागे टाकून वैश्विक शांततेचा पाया घालतात.प्रत्येकाला हे सिद्धांत ऐकून परमानंद प्राप्त करता येऊ शकतो.

■ **- गणेश खाडे,**

विचारवंत साहित्यिक लेखक आध्यत्मिक मार्गदर्शक तथा संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ महाराष्ट्र

9011634301

# शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणचा स्तुत्य उपक्रम; तालुकास्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## सलग चौथ्या वर्षी एमपीएससीच्या धर्तीवर आयोजित परीक्षेत सुमारे 1000 विद्यार्थ्यांचा सहभाग

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):**

ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञानासह वाचन-लेखनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने शिक्षक मैत्री प्रतिष्ठाण, अंबाजोगाईच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेचे हे सलग चौथे वर्ष असून यंदा जवळपास १००० विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदवला.

स्वामी विवेकानंद, राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माताई रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संकल्प विद्या मंदिर, अंबाजोगाई येथे ही परीक्षा घेण्यात आली. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा तसेच शहर व परिसरातील खासगी शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने या परीक्षेस उपस्थित होते.

ही सामान्य ज्ञान परीक्षा एमपीएससीच्या धर्तीवर घेण्यात आली असून ५० गुणांची, ५० वस्तुनिष्ठ प्रश्नांची परीक्षा होती. प्रत्येक प्रश्नाला प्रत्येकी एक गुण देण्यात आला. इयत्ता ५ वी ते ७ वी आणि ८ वी ते १० वी अशा दोन गटांमध्ये ही परीक्षा संपन्न झाली. दरवर्षी विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद अधिक बळकट होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या परीक्षेच्या आयोजनामागील संकल्पना शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी मांडली. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण व्हावी, आत्मविश्वास वाढावा व भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षांसाठी ते सज्ज व्हावेत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे संकल्प विद्यालयाचे सर्वेसर्वा प्रा कैलास चोले योगेश्वरी न्यूज चैनल चे संपादक नागेश औताडे, नगरसेवक आकाश कराड स्वामी विवेकानंद विद्यालयातील शिक्षिका जयश्री लहाने या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्पर्धा ही प्रगतीची पहिली पायरी असून परस्पर स्पर्धेतूनच विद्यार्थी स्वतःला अधिक सक्षम बनवतात,असे मत व्यक्त केले. तसेच अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये टिकून राहण्याची जिद्द व अभ्यासाची शिस्त निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.






उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष विजय रापतवार सर्व सहकारी स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देत असल्याबद्दल पाहुण्यांच्या वतीने प्रतिष्ठाणच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.संकल्प विद्या मंदिर प्रशासना कडून या परीक्षेसाठी मागील काही वर्षांपासून मोलाचे सहकार्य मिळत असून भविष्यातही असेच सहकार्य दिले जाईल,अशी ग्वाही संस्थेच्या वतीने प्रा कैलास चोले यांनी दिली.

परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसांचे वितरण करण्यात येणार असून, दोन्ही गटांमधून प्रथम क्रमांकास १५०१ रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकास १००१ रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तर उत्तेजनार्थ क्रमांकास ७०१ रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

ही परीक्षा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष विजय रापतवार उपाध्यक्ष पांडुरंग नरवडे सचिव विष्णू सरवदे कोषाध्यक्ष साधू गायकवाड सल्लागार उमेश नाईक मार्गदर्शक दत्ता देवकते यांच्या सह प्रतिष्ठाणच्याआत्माराम बनसोडे अनुरथ बांडे दीपक बिडवे श्रीधर देशपांडे अशोक पोपळघट अशरब पठाण संदीप दरवेशवार बाळासाहेब माने वैजनाथ अंबाड रुपेंद्र बडोले वैजनाथ गडदे समाधान धिवार विनायक चव्हाण बबन घुले मोरोपंत कुलकर्णी श्रीनिवास मोरे जयदीप देशमुख जगन्नाथ वरपे विष्णू मुसळे केशव कुसरे सचिन गिरगिरवार भाऊराव गवळी बालाजी टिळे सह सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महसूल मंत्री बावनकुळेच्या धडाकेबाज निर्णयाने "एनए" अट जाचक प्रक्रियेतून जनतेला मोठा दिलासा - शंकर देशमुख

**आष्टी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील युती सरकार व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या धडाकेबाज निर्णय प्रक्रियेमुळे जमीन धारकांसाठी एन ए परवानगीची अट जाचक प्रक्रियेतून जनतेला मोठा दिलासा मिळालेला आहे. ही जमीन धारकांसाठी आनंदाची बातमी असल्याचे मत भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला असून, बांधकामासाठी आता जिल्हाधिकाऱ्यांकडे चकरा मारण्याची गरज नाही. सातबारा उताऱ्यावर आता आपोआप नोंद होणार आणि वार्षिक अकृषी करही रद्द झाला आहे. महायुती सरकारचा सर्वसामान्यांना हा मोठा दिलासा आहे. राज्य सरकार अनेक जाचक कायदे आणि कायदेशीर नियमांचे अडथळे दूर करत आहे. गेल्या वर्षी सुद्धा ना. बावनकुळे यांच्या महसूल खात्याने जाचक अटी आणि शर्थी इतिहासजमा केल्या.



जमीन महसूल कायद्यात मोठा बदल करण्यात आला आहे. निवासी, वाणिज्य कारणांसाठी करण्यात येणार्या बांधकामाकरिता आवश्यक जमिनीच्या 'एनए' म्हणजेच अकृषक परवानगीची अटच आता रद्द करण्यात आली आहे.

मंगळवारी राज्य शासनाने याविषयीचा शासन आदेश जारी केला. यापूर्वी राज्यात बांधकामासाठी जमीन अकृषक परवानगी असणे आवश्यक होते. जिल्हाधिकाऱ्यांकडून अकृषक कर भरून जमीन बिनशेती करून घेणे आवश्यक होते. एनए परवानगी असल्याशिवाय बांधकाम परवानगी मिळत नव्हती. राज्यातील अकृषक वापर असलेल्या जमिनीवर महसूल विभागाकडून दरवर्षी अकृषक कर आकारला जात होता. तर स्थानिक संस्था नगरपालिका ग्रामपंचायती त्यावर मालमत्ता करही आकार होत्या. या दुहेरी कर पद्धतीला राज्यात अनेक वर्षांपासून विरोध होता. तो लक्षात घेत राज्य सरकारने एनएची अट रद्द केली आहे.

नागरिकांना यापुढे बांधकामांसाठी संबंधित नगररचना विभागाला अथवा स्थानिक प्राधिकरणाकडे अर्ज सादर करावा लागणार आहे. या कार्यालयाकडून एकवेळ अकृषक शुल्क भरून घेतल्या जाईल आणि ले-आऊटला मंजुरी दिली जाणार आहे. त्यामुळे आता जिल्हाधिकाऱ्यांकडून अकृषक परवानगीसाठी स्वतंत्र परवानगीची गरज नाही. या निर्णयाने राज्यातील शेकडो गृहनिर्माण संस्थांना त्याचा मोठा फायदा होणार आहे. परवानगीसाठी अर्जफाटे प्रक्रिया बंद होणार आहे. विद्यार्थ्यांनाही विविध प्रमाणपत्र काढण्यामध्ये मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे राज्य सरकार व ना. बावनकुळे यांचे स्वागत केले जात आहे.

# केज शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेची 4 एक्कर जागा हस्तंतरांचा घेतलेला ठराव तात्काळ रद्द करण्याची भाई मोहन गुंड यांची मागणी

**केज ( प्रतिनिधी )**

केज नगरपंचायत हाद्दितील सर्वे नंबर 07 मधील जिल्हा परिषद शाळेची 4 एक्कर जमीन आपन नगरपंचायत ला हस्तांतरीत करण्यासाठीचा ठराव आपण घेतलेला आहे तो तात्काळ रद्द करुन, त्या बाबद आपन नगरपंचायतने जिथे कुठे हस्तंतरानाच्या बाबतीमध्ये प्रस्ताव करून मागणी केल्या आहेत, तिथे ठराव रद्द केल्या बाबद चे पत्र नगरपंचायतने संबंधित विभागाला देऊन ठराव रद्द केल्या बाबतचे कळवावे अशी मागणी नगरपंचायतचे मुख्यअधिकारी. नगरअध्यक्षा सिता बनसोड यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड केली आहे.

सदरील शाळा कायमची बंद पडलेली नाही तिथे आज हि प्रथमिक शाळा चालु, माध्यमिक शाळा चालु करण्या संदर्भात सर्व वरीष्ट पातळीवर पत्र व्यवहार चालु आहेत 26 जानेवारीला माजी विद्यार्थ्यांचा मोठा मेळावा संपन्न झाला, मेळाव्यात सर्वांनी शाळा सुरू करण्यासाठी प्रयत्नशिल आहेत, येत्या जुन मध्ये शाळा सुरू होणार आहे, केज शहरातील नागरीक या शैक्षणिक चळवळीत सहभागी झाले आहेत, जुन मध्ये शाळा सुरू होणार आहे, त्यामुळे शहरातील लेकराच भाविष्य इथे घडणार आहे, नगरपंचायतने घेतलेला जमीन हस्तांतराचा ठराव तात्काळ रद्द करावा आशी विनंती करत ठराव रद्द न केल्यास नगरपंचायत कार्यालया समोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनात शेकाप नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे, निवेदनाच्या प्रति बीड जिल्हा अधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना हि पाठवण्यात आल्या आहेत.



# महाशिवरात्रीपूर्वी परळीत दररोज पाणीपुरवठा करा

## नगरसेवक नितीन बागवाले यांची प्रशासनाकडे ठाम मागणी

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी वैजनाथ शहरात सध्या नगरपालिकेकडून पाच दिवसांतून केवळ एकदाच नळाद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळ्याची चाहूल लागलेली असताना पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना, वृद्धांना आणि लहान मुलांना वणवण भटकावे लागत असून ही परिस्थिती अत्यंत गंभीर व अन्यायकारक असल्याची भावना शहरवासीयांमध्ये व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नगर परिषद गटनेते तथा युवा नेते नगरसेवक नितीनभाऊ बागवाले यांनी नागरिकांच्या वतीने परळी नगरपालिकेकडे तात्काळ दररोज पाणीपुरवठा सुरू करण्याची ठाम मागणी केली आहे.

नगरसेवक बागवाले यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, परळी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नागापूर येथील वाण धरणात सध्या मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. यंदा समाधानकारक पाऊस झालेला असतानाही नागरिकांना पाच दिवसांनी एकदाच पाणी देणे ही प्रशासनाची अक्षम्य चूक असून नागरिकांवर अन्याय आहे.

विशेष म्हणजे, परळी वैजनाथ हे पंचम ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथांचे पवित्र नगरी आहे. येत्या १५ फेब्रुवारीपासून महाशिवरात्री उत्सवाला प्रारंभ होत असून या कालावधीत लाखो भाविक परळीत दाखल होणार आहेत. अशा परिस्थितीत शहरात पाण्याची टंचाई निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी दररोज आणि वेळेवर समान पाणीपुरवठा करणे अत्यावश्यक असल्याचे बागवाले यांनी अधोरेखित केले.

"पाणी हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. मुबलक पाणीसाठा उपलब्ध असताना नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असेल, तर ही प्रशासनाची अपयशाची कबुली आहे," असे स्पष्ट शब्दांत सांगत बागवाले यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे. तात्काळ दररोज पाणीपुरवठ्याचा निर्णय न घेतल्यास नगरपालिकेविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.



महाशिवरात्रीसारख्या मोठ्या धार्मिक उत्सवाच्या पार्श्वभूमीवर परळी नगरपालिकेने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन शहरातील सर्व भागांमध्ये सुरळीत आणि नियमित पाणीपुरवठा करावा, अशी एकमुखी मागणी नागरिकांकडून होत आहे.

■ **"मुबलक पाणी असूनही नागरिकांना वणवण; हा अन्याय सहन करणार नाही" : नितीन बागवाले**

"नागापूरच्या वाण धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध आहे. तरीही पाच दिवसांनी एकदा पाणी देणे ही प्रशासनाची निष्क्रियता आहे. महिला, वृद्ध आणि लहान मुले पाण्यासाठी त्रस्त आहेत. महाशिवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविक शहरात येणार आहेत. त्यांची गैरसोय होऊ देणार नाही. तात्काळ दररोज व वेळेवर पाणीपुरवठा सुरू करावा; अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल."

# परळीत 'महापशुधन एक्स्पो-2026'चे भव्य आयोजन

## देशपातळीवरील 'महापशुधन एक्स्पो-2026' शेतकरी-पशुपालकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

परळी नगरीत ना. पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून साकारत असलेला देशपातळीवरील भव्य 'महापशुधन एक्स्पो-2026' हा पशुधन क्षेत्रासाठी ऐतिहासिक पर्व ठरणार आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ देणाऱ्या या प्रदर्शनात शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे यांनी केले आहे.

३२ एकर विस्तीर्ण जागेवर उभारण्यात येणारा हा महाएक्स्पो राज्यासह देशभरातील पशुपालक, शेतकरी, तज्ज्ञ, संशोधक आणि उद्योजकांना एकाच व्यासपीठावर आणणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित पशुधन जाती, दुग्धव्यवसायातील नवकल्पना आणि पशुपालनातील व्यवसायिक संधी यांचा संगम या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे.

नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे म्हणाले की, या महापशुधन एक्स्पोमुळे पशुपालकांना सुधारित जातींची माहिती, पशुखाद्य व औषधोपचारातील प्रगती, प्रक्रिया उद्योग, दुग्धव्यवसायातील आधुनिक पद्धती तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

यामुळे पशुपालकांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळून ग्रामीण भागातील आर्थिक सक्षमीकरणाला गती मिळेल. ना. पंकजाताई मुंडे यांच्या दूरदृष्टीतून उभारला जाणारा हा महाएक्स्पो परळीच्या विकासासाठी नवे दालन उघडणारा ठरणार असून पशुधन क्षेत्राच्या बळकटीसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

जिल्ह्यातील शेतकरी, युवक, महिला बचतगट, दुग्धव्यवसायिक आणि पशुपालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत मोठ्या संख्येने उपस्थित राहून 'महापशुधन एक्स्पो-2026' यशस्वी करावा, असे आवाहन नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे यांनी केले आहे.



# अंबाजोगाईत कॅथलॅब व कॅन्सर उपचार युनिट उभारणीसाठी पाठपुरावा करू - डॉ.ओमप्रकाश शेटे

**अंबाजोगाई | अशोक दळवे**

अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात कॅथलॅब व कॅन्सर उपचार युनिट उभारणीसाठी पाठपुरावा करू. अशी ग्वाही आयुष्मान भारत मिशन समितीचे महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिली.

मंगळवारी दुपारी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात विस्तारित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या आढावा बैठकीत डॉ. ओमप्रकाश शेटे बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की बीड जिल्ह्यात ११ लाख नागरिकांचे आयुष्मान कार्ड वितरित झाले आहेत. शासन सामान्य रुग्णांना आयुष्मान च्या माध्यमातून मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देत आहे. अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात आगामी काळात स्वतंत्र कार्डीओलोजी विभाग व कॅथलॅब, कॅन्सर उपचार युनिट, साधे, गुडघे बदलाची शस्त्रक्रिया अशी अत्याधुनिक उपचार पद्धती उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तसेच वैद्यकीय महाविद्यालयाच्या १५० सीट वरून त्या २५० कशा होतील. तसेच डॉक्टरांच्या व इतर रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.




यावेळी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा,प्रभारी अधिष्ठाता डॉ. अरविंद बगाटे, डॉ. चंद्रकांत चव्हाण,डॉ.राजेश कचरे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख, आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.